शासन सेवेतून सेवानिवृत्त होणा-या अधिकारी/कर्मचारी यांच्या निवृत्तीवेतन प्रकरणी तातडीने कार्यवाही करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः सेनिवे-२०१७/प्र.क्र.(३२२/१७)/आ(क्षेप्र)
तिसरा मजला, मुख्य इमारत, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ०३ जानेवारी, २०१८.

<u>परिपत्रक:-</u>

जलसंपदा विभागामध्ये वर्ग-१ ते वर्ग-४ च्या अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवाविषयक प्रकरणी अंतिम निर्णय घेण्याबाबत **वित्त विभागाच्या शासन निर्णय दिनांक २ जून २००३ अन्वये** विहित केलेल्या प्राधिका-यांच्या स्तरावर सदरहू शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या मर्यादेमध्ये निर्णय घेतले जातात. दैनंदिन प्रशासकीय बाबींमध्ये निर्णय घेण्यासाठी अधिकारांचे विकेंद्रीकरण हे प्रकरणांचा त्वरीत निपटारा केला जावा व विलंबास प्रतिबंध करावा ह्या उद्देशाने केलेले आहे. असे असतांनाही जलसंपदा विभागामध्ये सेवानिवृत्तीविषयक प्रकरणे हाताळतांना अक्षम्य दिरंगाई होते आहे व त्यामुळे न्यायालयीन प्रकरणांची संख्या वाढते आहे. ही बाब मा.न्यायालयाने/मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने/मा.लोक आयुक्त यांनी वेळोवेळी शासनाच्या निदर्शनास आणून दिली आहे.

निवृत्तीविषयक प्रकरणांमध्ये अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार हे त्या त्या कार्यालयप्रमुखांना असतांनाही वेळीच निर्णय न घेतल्याने अश्या प्रकरणी प्रत्येक वेळी प्रधान सचिवांना प्रतिवादी केले जाते तर काही प्रकरणांमध्ये प्रधान सचिवांनी स्वत: न्यायालयात शपथपत्र दाखल करण्याच्या सूचना मा.न्यायालयाने दिल्या आहेत. ब-याचवेळा मा.न्यायालयाच्या आदेशाची विहित मुदतीमध्ये कार्यालय प्रमुखांकडून कार्यवाही न झाल्याने प्रधान सचिवांना अवमान याचिकेस उत्तर देणे भाग पडते. सेवानिवृत्तीविषयक प्रकरणी कार्यालय प्रमुखांकडून वेळीच कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने तसेच विलंबाने प्रदान केलेल्या निवृत्तीविषयक लाभांवरती व्याज द्यावयाची नामुष्की टाळण्याच्या अनुषंगाने सर्व मंत्रालय स्तरावरील त्या त्या संवर्गाच्या प्रशासकीय बाबी हाताळणा-या कार्यासनांना तसेच क्षेत्रीय स्तरावरील कार्यालय प्रमुखांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

१. <u>जलसंपदा विभाग (खुद्द) आस्थापनेवरील कार्यरत असलेल्या तांत्रिक अधिका-यांबाबत</u> :- ह्या अधिका-यांच्या सेवाविषयक बाबी पूर्ण करण्याची सर्व जबाबदारी मंत्रालयातील प्रशासकीय बाबी हाताळणा-या संबंधित कार्यासनाची राहील. संबंधित संवर्गाच्या सेवाविषयक बाबी हाताळणा-या कार्यासनाकडून परिपूर्ण निवृत्तीवेतन विषयक प्रस्ताव आ(क्षेप्र) कार्यासनाकडे प्राप्त झाल्यानंतर असे परिपूर्ण प्रस्ताव महालेखापाल कार्यालयास पाठविण्याची कार्यवाही आ(क्षेप्र) कार्यासनाने विनाविलंब करणे आवश्यक आहे. तसेच सेवाविषयक बाबी मध्ये काही त्रुटी असल्यामुळे संबंधित अधिका-याला निवृत्तीवेतनाचे लाभ देणे शक्य होत नसल्यास अथवा विलंबाने प्रदान केले असल्यास व त्यामुळे न्यायालयीन/लोकआयुक्त प्रकरण इ. उद्भवल्यास त्याबाबत सर्व आवश्यक कार्यवाही संबंधित **प्रशासकीय बाबी हाताळणा-या** कार्यासनाने करावी.

२. <u>जलसंपदा विभागाच्या अधिनस्त क्षेत्रीय स्तरावरील कार्यरत वर्ग-१ ते वर्ग-४ च्या अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवानिवृत्तीविषयक प्रकरणी</u> :- त्वरीत कार्यवाही करण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखाची आहे. त्यांचेकडून विहित कालमर्यादेत याविषयी कार्यवाही न

झाल्यामुळे जर काही न्यायालयीन/लोक आयुक्त प्रकरण उद्भवल्यास त्याची सर्व जबाबदारी कार्यालय प्रमुखाची राहील.

३. जर एखाद्या प्रकरणामध्ये सेवाविषयक बाबीच्या अनुषंगाने शासनाच्या मार्गदर्शनाची अथवा शासनाच्या मान्यतेची आवश्यकता कार्यालय प्रमुखांना आवश्यक वाटत असल्यास त्यांनी त्या त्या आस्थापनेच्या प्रशासकीय बाबी हाताळणा-या मंत्रालयातील संबंधित कार्यासनाकडे याबाबत त्वरीत संपर्क साधून आवश्यक ती कार्यवाही विहित मुदतीमध्ये पूर्ण करावयाची आहे. अशा सेवानिवृत्ती विषयक प्रकरणी जर काही न्यायालयीन प्रकरणे उद्भवल्यास/अथवा लोक आयुक्तांकडे तक्रार दाखल झाल्यास अश्या प्रकरणी कार्यवाही करण्याची सर्व जबाबदारी संबंधित क्षेत्रीय कार्यालय प्रमुख तसेच या विभागांतर्गत मंत्रालय स्तरावर सेवाविषयक बाबी हाताळणा-या कार्यासनाची राहील.

४. जलसंपदा विभागाच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयातील वर्ग-१ ते वर्ग-४ च्या संवर्गातील अधिकारी/कर्मचा-यांची निवृत्तीवेतनाची सर्व प्रकरणे, तसेच या अनुषंगाने प्राप्त होणारी निवृत्तीवेतनविषयक न्यायालयीन प्रकरणे/लोक आयुक्त प्रकरणे ही त्या त्या संवर्गाच्या आस्थापनाविषयक बाबी हाताळणा-या अथवा ज्या अनियमित सेवाविषयक बाबींमुळे निवृत्तीवेतन अदा करण्यास अडचण उद्भवली आहे त्या बाबींवर अभिप्राय देण्यास/कार्यवाही करण्यास/निर्णय घेण्यास सक्षम असणा-या मंत्रालयातील जलसंपदा विभागातील कार्यासनाकडून कटाक्षाने हाताळण्यात येतील याची दक्षता घ्यावी.

५. निवृत्तीवेतन विषयी कार्यवाही करण्यास विलंब झाल्यास व त्यामुळे शासनास व्याज द्यावे लागल्यास वित्त विभागाच्या **शासन अधिसूचना दिनांक १ नोव्हेंबर २००८** अन्वये विलंबास जबाबदार असलेल्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करुन त्यांचेकडून अश्या व्याजाची वसूली करण्याची तरतूद आहे. ही बाब विचारात घेता, सेवानिवृत्ती विषयक प्रकरणी उपरोक्त सुधारीत सूचना विचारात घेवून त्वरीत कार्यवाही करावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१८०१०३११२९१९४३२७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Govind Appasaheb Lokhande

Digitally signed by Govind Appasaheb Lokhande
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f497facd37c9db39517e49b131f934002bb9765b01b8f0ea3dca43732f3ecd29, serialNumber=ce89373fc7a728d2cdfa1a26c08e1e3f7e3f4f232c1bd146794d3cc3034d5701, cn=Govind Appasaheb Lokhande
Date: 2018.01.04 11:30:10 +05'30'

(गो.आ.लोखंडे)
शासनाचे सह सचिव

प्रत,

१. महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान संशोधन सुरक्षा, नाशिक,
२. सर्व कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ पुणे/विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर/गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद/कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे/तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव.

३. जसंवि च्या अधिपत्याखालील सर्व मुख्य अभियंते/ मुख्य अभियंता व मुख्य लेखापरीक्षक जल व सिंचन, म.रा.औरंगाबाद,
४. जसंवि च्या अधिपत्याखालील सर्व परिमंडळीय अधीक्षक अभियंते. त्यांना विनंती की, कृपया उपरोक्त परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व कार्यकारी अभियंता यांना पाठवून त्यानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना द्याव्यात.
५. अधीक्षक अभियंता, कृष्णा पाणी तंटा लवाद कक्ष, पुणे/अधीक्षक अभियंता व सचिव आंतरराज्य नियंत्रण मंडळ, नागपूर.
६. सर्व सह सचिव /उपसचिव/ कार्यासन अधिकारी, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. आ (क्षेप्र) संग्रहार्थ.